**आर.सी. सी. ३१०/२०२३**
**सरकार वि.बशीर शेख**
**साक्षीदार क्र.०१ , नि. क्र.२०**

साक्षीदाराचे नाव-ईब्राहीम युसुफ शहा
वय. २८ वर्ष, उपजिवीका.- शेती ,
रा. गणेशपुर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

**<u>सरतपास शपथेवर सरकारी पक्षातर्फे श्री. पी. आर. कुर्लेकर यांच्या मार्फत ०१.३१ वाजता सुरु</u>**

१. माझी शेती गणेशपुर येथे कोळंबी शिवारात गट क्र. ३७ मध्ये आहे. माझ्या शेतीच्या बाजुला बशीर शेख यांची शेती आहे. घटना दिनांक १४.०६.२०२३ ची दुपारी ०२.०० वाजता घडली होती. त्यादिवशी दुपारी ०२.०० वाजता मी व माझे वडील युसुफ शहा शेतात काम करत होतो. त्यावेळी आरोपी क्र. १ ते ४ तेथे आले व ते आम्हाला शिवीगाळ करु लागले. ते म्हणत होते की, 'आमचा बांध का कोरला.' आरोपी क्र. १ ने मला पकडुन खाली पाडले. सर्व आरोपी मला लाथा बुकयांनी छातीवर, डोक्यावर, पोटात मारहाण करु लागले. आरोपी क्र.४ ने मला काठीने डाव्या जबडयावर मारले त्यामुळे माझ्या तोंडातुन रक्त येउ लागले. आमचा आरडाओरडा ऐकुन माझे वडील,चुलत भाउ हनीफ शहा व खलील शहा हे धावुन आले. आरोपींनी त्यांना सुध्दा चापट बुक्यांनी मारहाण केली.

२. त्यानंतर सलीम अब्बास शहा व रौफ भिकन शहा हे आम्हाला सोडविण्यसासाठी आले. आम्हाला सोडविल्यानंतर आम्ही पिशोर पोलिस ठाण्यात गेलो. आम्हाला पोलिसांनी चिंचोली येथील सरकारी दवाखान्यात प्रथम पाठविले. चिंचोली येथे आमच्यावर प्राथमिक उपचार झाल्यानंतर आम्हाला औरंगाबाद येथील घाटी दवाखान्यात पाठविले. त्यानंतर आम्ही एक ते दोन दिवस उपचार घेतली व दिनांक १६.०६.२०२३ रोजी तक्रार नोंदिवण्यात आली. आता मला ती तक्रार दाखविण्यात आली ती तीच असुन त्यावर माझी सही आहे. ती मी ओळखली आहे. त्यास **निशाणी २१** देण्यात येते.

३. ज्या काठीने मला मारहाण करण्यात आली ती दाखविल्यास मी ओळखु शकतो. आता मला पीआर क्र. ७०/२०२४ दाखविण्यात आले. याच काठीने मला मारहाण करण्यात आली होती. सदर काठीस आर्टिकल अ देण्यात येत आहे.

४. मला झालेल्या दुखापती संदर्भात फोटो पोलिस ठाण्यात देण्यात आले आहे. सदर छायाचित्रे मला दाखविण्यात आले. ते तेच असुन बरोबर आहे त्यास आर्टिकल ब

देण्यात येत आहे. आरोपींना पाहील्यास मी ओळखु शकतो. आरोपी क्र. १ व ३ आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे एन एम. शेख यांच्याद्वारे सुरु</u>**

५. गट क्र. ३७ मध्ये युसुफ शहा नवाब शहा, खलील शहा, हनीफ शहा, रुकसाना सलीम शहा, शाहानाज सोळुंके हे मालक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी हे सर्वजण आपापल्या शेतात काम करत होते. गट क्र. ३७ च्या चतुःसिमा मला सांगता येणार नाही. युसुफ शहा नवाब शहा यांच्या हिस्याच्या शेतीची चतुःसिमा मला सांगता येणार नाही.

६. मी पोलिसांनी ७/१२ ची प्रत दिली होती किंवा नाही हे मला सांगता येणार नाही. माझे आडनाव शेख नाही शहा आहे. माझी एक हेक्टर आठ गुंठे जमीन आहे. त्याची मोजणी करण्यात आली आहे पण माझी शेतीचे क्षेत्र कमी भरते. मोजणीचे कागदपत्रे मी न्यायालयात दाखल करु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी शेती कमी भरते याचा संशय मला आरोपींवर आहे. मी घाटी मध्ये दोन दिवस उपचाराकरीता दाखल होतो. घाटीतुन सुटल्यावर मी पोलिसांना डिसचार्ज कार्ड दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी घाटीत दाखल नव्हतो.

७. मी पिशोर पोलिस ठाण्यात ०२.३० ते ०३.०० वाजता गेलो होतो. माझ्या गावापासुन पिशोरला जाण्यासाठी वीस मिनीटे लागतात. मी त्यादिवशी मोटरसायकलने गेलो होतो. बस सुध्दा जाण्यासाठी उपलब्ध असते. मला मोटरसायकल चालविता येते परंतु माझ्याकडे लायसन नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्यांना मोटरसायकल चालविता येते त्यांना आरटीओ कडुन लायसन मिळते. हे म्हणणे खरे नाही की, मला मोटरसायकल चालविता येत नाही.

८. माझ्या तोंडातुन रक्त आल्यामुळे शर्टावर थोडे दाग पडले होते ते कपडे मी पोलिसांना दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे मी माझे वडील युसुफ शहा, माझे भाउ सलीम, खलील शहा आम्ही सगळे जण एकमेकांचे सल्ले घेउन काम करतो. हे म्हणणे खरे आहे की, मी व माझे वडील एकमेकांशी सल्लामसलत करतो.

९. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमच्यामध्ये दिवाणी स्वरुपाचा वाद आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझ्या वडीलांना सल्लामसलत करुन आरोपींवर फौजदार केस दाखल केली आहे.

१०.            मी पोलिसांना व डॉक्टारांना सांगीतले होते की, ‘मला छातीला, डोक्याला व पाटाला मार लागला आहे. ’ मी पोलिसांना असे सांगीतले होते की, ‘आरोपी क्र. १ ने मला खाली पाडले.’ तसे माझ्या जबाबात का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, पिशोर पोलिस ठाण्याच्या समोर मोठे ग्रामीण रुग्णालय आहे.

११.      हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकुर खोटा आहे. सलीम व रौफ हे माझे काका आहेत. हे म्हणणे खरे आहे की, हे माझ्या शेतीच्या आजुबाजुला खुप लोक राहतात. हे म्हणणे खरे आहे की, आर्टिकल अ वरील काठी जंगलात भरपुर भेटतात. हे म्हणणे खरे नाही. की, मला कोणतीही मारहाण झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VIJAYA NARAYANRAO KATKAR
Date: 2024.11.16 10:46:33 +0530

**ठिकाण : कन्नड**
**दिनांक : १५/११/२०२४**

**(काटकर विजया एन.एस.)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.३) कन्नड.**